प्रेसनोट दिनांक ०२.०७.२०१८

श्री. रामहरी दादाराव माने, वय ४२ वर्षे व्यवसाय तलाठी, सज्जा सिंदगाव, ता. तुळजापुर, जि. उस्मानाबाद यांनी तक्रारदार यांच्या पिक कर्जाचा बोजा ७/१२ वर चढवण्यासाठी फेर नोंदवुन तो मंडळ अधीकारी यांचेकडुन मंजुर करुन घेवुन तसा ७/१२ उतारा देण्यासाठी १००० रुपये लाच तुळजापुर येथे स्विकारल्याने त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही.

तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरोकडे तक्रार दिली, त्याची थोडक्यात हकिगत अशी की तक्रारदार यांच्या पिक कर्जाचा बोजा ७/१२ वर चढवण्यासाठी -फेर नोंदवुन तो मंडळ अधीकारी यांचेकडुन मंजुर करुन घेवुन तसा ७/१२ उतारा देण्यासाठी १००० रुपये लाचेची मागणी केली.

त्यामुळे पोलीस अधीक्षक मा. डॉ. श्रीकांत परोपकारी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक श्री. बी. व्ही. गावडे व श्री. बी.जी.आघाव, पोलीस निरीक्षक यांनी तक्रारीची शहानिशा करुन अे.सी.बी युनीटच्या सहाय्याने सापळा रचुन आज दि. ०२/०७/२०१८ रोजी श्री. रामहरी दादाराव माने, वय ४२ वर्षे व्यवसाय तलाठी, सज्जा सिंदगाव, ता. तुळजापुर यांनी वर नमूद कामासाठी तक्रारदार यांचेकडुन १०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांना तुळजापुर येथे रंगेहात पकडण्यात आले. यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अंतर्गत पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे. प्रकरणाचा पुढील तपास श्री. बी.जी.आघाव, पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, उस्मानाबाद हे करित आहेत.

ॲन्टी करप्शन ब्युरो, उस्मानाबाद तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया खालील मोबाईल, दूरध्वनीवर, टोल फ्री क्रमांकावर, अे.सी.बी. विभागाचे मोबाईल ॲप्सद्वारे www.acbmaharashtra.net या संकेतस्थळावर तक्रारी नोंदविण्यासाठी संपर्क साधावा.

मोबाईल क्रमांक :- ९६३७०६१४७८, टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र.- ०२४७२-२२२८७९

प्रति,

मा.संपादक, दैनिक

कृपया वरील वृत्त आपल्या दैनिकामध्ये प्रसिध्द करावे ही विनंती.

02/07/18

(बी. व्ही. गावडे)

पोलीस उप अधीक्षक,

ॲन्टी करप्शन ब्युरो,उस्मानाबाद.